आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. ८०

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ११ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव — नागेंद्र कुमार पंडा

वय — ५७ वर्षे, व्यवसाय — असिसटन्ट जनरल मॅनेजर सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, हेड ऑफिस मुंबई,

राहणार—ठाणे, नवी मुंबई.

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती.एस.ए. बाबर यांचेमार्फत</u>**—

मी सन २०२१ मध्ये सेंन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया अहमदनगर येथे जुन २०१९ ते जुलै २०२१ पर्यंत क्षेत्रिय प्रबंधक म्हणुन होतो. आरोपी गौतम वसंत जाधव यास मी ओळखत नाही पण मी त्याचे नाव ऐकले आहे. आरोपी सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया शाखा वडझिरे, पाडळी दर्या येथे बॅंक मित्र म्हणुन होता. आर.बी.आय.ने बॅंक मित्र यांना बरेच कामाचे स्वरूप दिलेले असुन त्यामध्ये बॅंक मित्र हे पैसे खातेदारांकडुन घेणे, जमा करणे तसचे ठेवी घेणे व ठेवी जमा करणे अशी कामे करत असतात. बॅंक मित्र म्हणुन सरकारने प्रत्येक ठिकाणी बॅंक ऑपरेशन्स होऊ शकत नसल्यामुळे गावातील लोकांना बॅंक कामामध्ये काही त्रास होऊ नये याकरीता बॅंक मित्र म्हणुन नियुक्त केले आहे. गौतम जाधव बॅंकेत कधीपासुन काम करत होते हे मला सांगता येणार नाही. (ज्ञानदेव निघुटे यांनी फिर्याद दिली होती. आरोपीतर्फे वकिलांनी आक्षेप घेतला की, साक्षीदाराने फिर्यादीचे नाव बघुन सांगितले.) ज्ञानदेव निघुटे यांनी तक्रार दिली होती की, गौतम जाधव यांना दोन लाखाचा एक चेक व अडीच लाखाचा दुसरा चेक फिक्स डिपॉजिट करण्यासाठी दिला होता. गौतम जाधवने ज्ञानदेव निघुटे यांना खोटे फिक्स डिपॉजिटच्या पावत्या दिल्या होत्या. त्यानंतर निघुटे यांनी गौतम जाधव यांना फिक्स डिपॉजिटच्या पावत्या त्यांना पैशे काढण्यासाठी दिल्या असता गौतम जाधवने फिक्स डिपॉजिटच्या पावत्या ठेऊन घेतल्या व निघुटे यांना त्या पावत्यावरील रक्कम दिली नाही. ज्ञानदेव निघुटे यांना आमच्या मुख्य कार्यालयास मेलवरुन तक्रार दिली होती. तो मेल आमच्याकडे पाठवण्यात आला व त्यानंतर आम्ही प्राथमिक चौकशी केली. मी पारनेरमधील ब्रांच मॅनेजर यांना प्राथमिक चौकशी करण्यासाठी पाठवले. चौकशीत आढळुन आले की, गौतम जाधव यांनी त्या दोन चेकवरील रक्कम विथड्रॉ केली व त्याचे खोटे फिक्स डिपॉजिट पावत्या दिल्या व त्या दोन्ही चेकवर मागे गौतम जाधव याच्या सह्या होत्या. त्यानंतर पुढे वडझिरे शाखेतुन अजुनही तक्रारी यायला लागल्या. श्री. तिकोने, चौधरी, साठे व श्रीमती प्रमिला त्यांचे तक्रारी आल्या होत्या.

(सरकारी वकिलांनी साक्षीदारास तिकोने यांची काय तक्रार होती असे विचारले असता साक्षीदाराने सांगितले की मला ते बघुन सांगावे लागेल. यावर आरोपीने आक्षेप घेतला की, त्यांचा डिफेन्स मागील पासुन बँक अधिकाऱ्यांविरुध्द असुन त्यामुळे सदर साक्षीदारास काय तक्रार होती हे कागदपत्र दाखवता येणार नाही. सरकारी वकिलांनी युक्तीवाद केला की, भारतीय पुरावा कायदा कलम १५९ खाली सदर साक्षीदारास सदर कागदपत्र दाखवता येऊ शकते. आरोपीतर्फे वकिलांनी प्रति उत्तर दिले की, कलम १५९ खालील तरतुदीचा अवलंब करता येणार नाही. नि.८१ वर अभियोग पक्षातर्फे दाखल अर्जावर आरोपी पक्षाचे म्हणणे घेऊन व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकुन त्यावर आदेश पारीत करण्यात आला असुन तो अर्ज मंजुर करण्यात आला असुन आरोपीने न्यायालयासमोर सांगितले की, त्याला सदर आदेशविरुध्द वरीष्ठ न्यायालयाकडे रिव्हीझन दाखल करायची आहे. आरोपीचा रिव्हीझन करण्याचा अधिकार पाहता सदर साक्षीदाराची साक्ष ही पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे. )

सबब उर्वरित सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(एन.एस.सबनीस)

दिनांकः ०६/१२/२०२४. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.